महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत**
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कँम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

क्र.महानिर्मिती/जा.क्र.०२-२०२५/ No 10062 दिनांक: 13 NOV 2025

## सूचना

**विषय :-** जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये "अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ" या दोन्ही पदांसाठी ऑनलाईन परीक्षेअंती कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांबाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०२/२०२५
२) महानिर्मिती सूचना क्र.०२/२०२५ चे सुधारपत्र क्र.२४७९ दि.३०.०३.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्र.३३४३ दि.१६.०४.२०२५
४) महानिर्मिती सूचना क्र.५०१५ दि.०५.०६.२०२५
५) महानिर्मिती सूचना क्र.५४१२ दि.१९.०६.२०२५
६) महानिर्मिती सूचना क्र.९९५७ दि.११.११.२०२५

---

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये "अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ" या पदांची सरळसेवा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. जाहिरातीच्या अनुषंगाने सदरील पदांची ऑनलाईन परीक्षा पार पाडण्यात आली होती.

जाहिरातीत नमुद सामाजिक / समांतर आरक्षणानुसार उपरोक्त ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संदर्भिय क्र.०६ वरील सूचने अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरील सूचनेत उमेदवारांनी कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता पदनिहाय व दिनांकनिहाय उपस्थितीची यादी देखील प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदरील संदर्भिय क्र.०६ वरील सूचनेनुसार कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता जे उमेदवार "अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ" या दोन्ही पदांसाठी पात्र ठरले आहेत अशा उमेदवारांची कागदपत्रे दिनांक १९.११.२०२५ रोजीच एकत्रितपणे जमा करण्यात येतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. म्हणजेच दोन्ही पदांसाठी स्वतंत्रपणे कागदपत्रे जमा करण्याची आवश्यकता नाही. तसेच जे उमेदवार केवळ "अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ" अथवा "उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ" यापैकी केवळ एका पदासाठी कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेस पात्र ठरले असतील, अशा उमेदवारांची कागदपत्रे जमा करण्याची प्रक्रिया संदर्भिय क्र.०६ वरील सूचनेत नमूद केल्याप्रमाणे पार पाडण्यात येईल. याशिवाय संदर्भिय क्र.०६ वरील सूचनेत नमूद इतर अटी व शर्ती / सूचना अबाधित राहतील.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती